# ज्ञानयज्ञ

**आमचे ध्येय:**
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*

SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

१० वा अंक

## १० वी आणि १२ वी नंतर काय ?

## आम्ही उघडतो सर्व दरवाजे तुमच्या उज्ज्वल भवितव्याचे....




वर्ष ४ | अंक १० | जानेवारी–एप्रिल २०१५



# "एसडी-सीड मार्गदर्शन करणारे दीपगृह..."

जळगाव जिल्ह्यात मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थ्यांना एसडी–सीड शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या या कार्यात आलेल्या अडथळ्यांवर मात करत आणि पुढे किती अडथळे येवू शकतात याची पर्वा न करता हे कार्य अखंडपणे चालू आहे. ही स्वयंसेवी संस्था एखाद्या दीपगृहासारखी न डगमगता अनेक गरजू विद्यार्थ्यांना प्रकाशाकडे नेण्याचा मार्ग दाखविते. एसडी–सीड त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते, जसे इंग्रजी बोलणे, करिअर समुपदेशन, वेळेचे व्यवस्थापन, तणावाचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण, संभाषण कौशल्य, देहबोली आणि सार्वजनिक ठिकाणी किंवा चारचौघात बोलणे आणि मुलाखतीचे तंत्र वगैरे वगैरे. विद्यार्थी त्यांचे शिक्षण चालू असताना या कार्यक्रमात सहभागी होवू शकतात.

कोणत्याही व्यक्तीने किंवा स्वयंसेवी संस्थेने इतक्या अंतरात्म्याने यासारखे सामाजिक कार्य कलेले नाही, जे एसडी–सीड अथकपणे करीत आहे. म्हणून सुरेशदादा, रत्नाभाभी, मिनाक्षीताई, नियामक मंडळ व सल्लागार समितीचे सदस्य, तालुका समन्वयक आणि एसडी–सीड सहकारी या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्यांनी जळगाव जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तम सेवा प्रदान केली आहे. आज समाजात अनेक श्रीमंत व्यक्ती आहेत, परंतु सुरेशदादांसारखी प्रत्यक्ष परोपकारी आणि धर्मादाय व्यक्ती अत्यंत दुर्मिळ आहे.

मी खूप आनंदी आहे की या बातमीपत्राच्या दहाव्या अंकाचा संपादक होण्याचा मला मान मिळाला. हे बातमीपत्र विद्यार्थी समाजाला अतिशय उपयुक्त आहे. शैक्षणिक क्षेत्रात ते अपडेट असावेत, त्यांना उपयुक्त माहिती मिळावी, मागदर्शनपर आणि प्रेरणादायी लेख त्यांना मिळावेत जेणेकरून शिक्षणात ते नेहमी वरचढ राहतील हा एकमेव उद्देश समोर ठेवून हे बातमीपत्र सुरू करण्यात आले. या अंकात देखील, दहावी व बारावी निकालानंतरचा काळ लक्षात घेता त्यांना करिअर मार्गदर्शनपर महत्त्वाचे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत.

आपण जर कोणाला विचारले की, "तुम्ही का शिकत आहात?" त्यावर वेगवेगळी उत्तरे मिळतात, जसे उदरनिर्वाहासाठी, पैसे कमविण्यासाठी, श्रीमंतीसाठी आणि सर्व सुविधांनी युक्त असे जीवन जगण्यासाठी, वगैरे. परंतु एसडी–सीडमध्ये यावर एकच असे योग्य उत्तर मिळते, ते म्हणजे "समाज कल्याणासाठी आणि जीवनमान उंचावण्यासाठी." या अनुषंगाने, एसडी–सीडने देखील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे जीवन कौशल्ये, जन कौशल्ये आणि व्यावहारिक कौशल्ये देण्यास सुरूवात केली आहे.

डॉ. राधाकृष्णन यांनी म्हटले आहे की, "शिक्षणामुळे विद्यार्थी नुसते तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि शैक्षणिकदृष्ट्या कार्यक्षम बनत नाहीत, तर त्यांच्यात मानवजातीसाठी उपकाराची भावना आणि प्रेम देखील निर्माण होते." स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत असे, "आम्हांला अशा शिक्षणपद्धतीची गरज आहे ज्याने माणूस घडावा आणि राष्ट्राची उभारणी व्हावी. शिक्षण हे गुणधर्माला आकारणी देणारे हवे. शिक्षण म्हणजे परिपूर्णतेचा आविष्कार आहे, जो उपजतच माणसात आहे." जर आपण शिक्षणाच्या संबंधित सर्व पुस्तके वाचली, तर आपण या निष्कर्षाला येवून पोहोचतो की, प्रत्येक विचारवंत वा शिक्षक हा आत्मनिर्भरता, आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणा यावरच अधिक भर देतो. आणि अगदी याच धर्तीवर एसडी–सीड विचार करते आणि विद्यार्थी घडविते.

तुमचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन जर योग्य असेल, तर जीवन खूप सुंदर आहे. आमरसाच्या आस्वादाप्रमाणे आपणांस जर जीवनाचा आस्वाद घ्यायचा असेल तर जीवनात काही गुण संपादन करण्याची गरज आहे. जसे जीवन कौशल्ये, चांगले आरोग्य आणि जीवनातील योग्य बोध घेणे. त्यासाठी दोन्ही म्हणजे मानसिक व शारीरिकदृष्ट्या सतत सराव, उजळणी आणि अभ्यासाची गरज आहे. पैसे जीवनात आवश्यक आहेत, परंतु पैसे कमविणे हा जीवनाचा केवळ उद्देश असू नये. आपण चैनबाजीत पडता कामा नये. आपले जीवन साधी राहणी आणि उच्च विचारसरणीने समृद्ध असावे. ऐषाराम असावा, परंतु ती आपली रोजची गरज बनू नये. थोडक्यात आपण म्हणू शकतो, "जहाल आणि वाईट सवयी काढून टाका."

आम्हाला वस्तुस्थिती माहीत आहे की, जीवनात बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण एक माध्यम आहे. ते बदल आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वर्तनविषयक असू शकतील. शिक्षणामुळे आपल्याला दूरदृष्टी प्राप्त होते. आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये कल्पनाशक्ती आणि उत्पादकतेला थोडा वाव आहे. परीक्षेमध्ये जास्तीत जास्त गुण मिळविणे याकडे नेहमी आपले लक्ष असले पाहिजे.

तर मित्रहो! येतो! पण शेवटी आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे, एसडी–सीड शिष्यवृत्ती योजना ही गुणवंत आणि कष्टाळू विद्यार्थ्यांसाठी आहे. कोणीही गरीब तसेच गुणवंत विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. या थोर कारणासह माननीय सुरेशदादांनी हे झंझावाती कार्य सुरू केले आहे. एसडी–सीड हे इतर सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी आणि पुढारी यांना मार्गदर्शन करणारे दिपस्तंभ आहे. आपणां सर्वांना पुढील काळ आनंदी व समृद्धमय जावो, ही सदिच्छा.

एसडी–सीडचे हे कार्य असेच अखंडपणे चालत राहो.

– प्रा. सुरेश पांडे
प्रमुख – इंग्रजी विभाग,
(जिनोसीस प्लस एड्युव्हेन्चर एलएलपी – जळगाव)

ज्ञानयज्ञ संपादक मंडळ
श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलिंद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

## दहावीनंतर कोणती शाखा निवडायची?




दहावीचा निकाल लागल्यानंतर कोणती शाखा निवडायची हा निर्णय घेणे खरोखरच एक कठीण बाब असते. परंतु तुमची वैयक्तिक आवड, तुमचे व्यक्तिमत्व, क्षमता, ताकद आणि करीअर ध्येय यांवर ही निवड अवलंबून असते.

**खाली काही टिप्स दिल्या आहेत ज्यामुळे तुम्हाला दहावीनंतर सर्वोत्तम शाखा निवडीसाठी मदत होईल.**

**सर्वात जास्त आवडणारा विषय निवडा:** विषय किंवा शाखा निवडताना अनेक पद्धतींपैकी एक उत्तम पद्धत म्हणजे ज्या विषयात तुम्ही खरोखरच चांगले आहात आणि त्याचा अभ्यास करताना तुम्हाला आनंद होतो तो विषय निवडणे. तर मग विचार करा, कोणता विषय तुम्हाला खरोखर आनंद देईल.

**तुमची बलस्थाने असलेले विषय निवडा:** अशा विषयांचे कॉम्बीनेशन निवडा ज्या विषयांमध्ये तुम्ही चांगले आहात. एक परिपूर्ण विषयांचे कॉम्बीनेशन निवडल्यास तुम्हाला नक्कीच त्या शाखेत श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची चांगली संधी मिळेल.

**कॉमर्स शाखेतील उपलब्ध करीअर पर्याय:** जर तुम्हाला गणित आणि फायनान्समध्ये आवड असेल तर तुम्ही कॉमर्स शाखेची निवड करा. पुढे तुम्ही चार्टर्ड अकाउंटन्सी, सर्टीफाईड फायनान्शिअल ॲनालिस्ट, कॉस्ट अकाउंटन्सी, कंपनी सेक्रेटरी, स्टॉक ब्रोकींग किंवा एमबीए यांसारख्या व्यावसायिक कोर्सेसची निवड करू शकता.

**सायन्स शाखेतील उपलब्ध करीअर पर्याय:** जर सायन्समध्ये तुम्हांला आवड असेल तर इंजिनीअरींग, सिव्हील एव्हीएशन, मर्चन्ट नेव्ही, मेडीसीन, आर्कीटेक्चर यांमध्ये पुढे शिक्षण सुरू ठेवू शकता.

**आर्टस् शाखेतील उपलब्ध करीअर पर्याय:** जर आर्टस् शाखेत तुम्ही गेलात तर मिडीया मॅनेजमेन्ट, डीझाईन, आर्टस्, सायकॉलॉजी, हॉस्पीटॅलीटी, कायदा किंवा शैक्षणिक यांमध्ये करीअर करू शकता.

**स्वत:चे मूल्यमापन करा:** तुम्ही स्वत:ला चांगले समजून घेण्यासाठी काही ॲप्टीट्युड टेस्ट आणि कौशल्य आणि व्यक्तिमत्वाचे ऑनलाईन मूल्यांकन करू शकता.

**शिक्षकांकडून सल्ला घेणे:** तुम्हाला योग्य मार्गदर्शन करणारे सर्वोत्तम व्यक्ती म्हणजे तुमचे शिक्षक आहेत, कारण ते तुम्हाला आणि तुमच्यात असलेल्या क्षमता ओळखतात. म्हणून ज्या शाखेची निवड करण्यास तुम्ही इच्छुक आहात, त्यासाठी तुमच्या शिक्षकांचा सल्ला घ्या.

लक्षात ठेवा, हे फार महत्त्वाचे आहे की ज्या क्षेत्रात तुमचा कल आहे किंवा तुम्हाला आवड आहे अशा शाखेचीच निवड करा, म्हणजे तुमचे करिअर परिपूर्ण व यशस्वी होईल. जेणेकरून तुम्हाला मानसिक समाधान मिळेल व जीवन आनंदमय होईल.

## करिअर निवडीसाठी विद्यार्थ्यांची भूमिका...

दहावी–बारावी परीक्षा संपल्यानंतर अनेकदा विद्यार्थी त्यांचे करिअर व पुढील शिक्षण याविषयी संभ्रमात असतात. त्यासाठी डोळसपणे सर्व बाबींचा विचार करून आणि योग्य मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. योग्य माहितीच्या आधारे जाणीवपूर्वक निवडलेले करिअर केवळ विद्यार्थ्यांची बौद्धिक, नैतिक क्षमता वाढवत नाही, तर देशाची सामाजिक, आर्थिक बाजूदेखील बळकट करत असते. प्रामुख्याने करिअर निवडताना 'भविष्यातील आर्थिक उत्पन्नाचे साधन' हा एकच विचार केला जातो. त्यात काही गैर नाही. परंतु त्याला विद्यार्थ्यांची व्यक्तिगत आवड तसेच बौद्धिक क्षमतेची जोड मिळाली, तर प्रत्येक व्यक्ती केवळ जॉब ओरिएंटेड न होता जॉब सॅटिसफॅक्शन मिळवू शकेल. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट, करिअर वेबसाइटस् उपयुक्त माहिती पुरवू शकतात. या सर्व प्रक्रियेत विद्यार्थी कोणती भूमिका घेवू शकतात, याचा मास्टर प्लान बनवूया.

### विद्यार्थ्यांची भूमिका

आजचा विद्यार्थी हा जागरूक, चौकस आहे. योग्य दिशेने वाटचाल केल्यास करिअर निवड ही खूप सोपी व सहज होवू शकेल.

- कॉलेज निवडताना वेळ वाचवण्याचा विचार करावा. वाचलेला वेळ सखोल अभ्यासाकरिता उपयोगी ठरेल.
- निवडलेल्या शाखेतील विविध करिअरसंबंधी माहिती अधिकृत वेबसाइटद्वारे मिळवता येईल.
- तुमच्या निवडलेल्या क्षेत्राशी संबंधित माजी विद्यार्थी उद्‌बोधक माहिती पुरवू शकतील.
- फेसबुक, व्हॉटसॲप व अन्य सोशल साइटद्वारे सीनिअर विद्यार्थी मित्र–मैत्रिणींशी चर्चा शक्य आहे.
- प्रत्येकाने स्वत:च्या जमेच्या बाजू आणि न जमणा–या बाजू जाणून घ्याव्यात. स्वत:च्या मूल्यमापनामुळे योग्य दिशेने वाटचाल शक्य होईल.
- शाळेतील शिक्षक तसेच मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन घ्यावे. तुम्हाला सर्वात चांगले ओळखणारे शिक्षकच असतात, जे तुम्हाला तुमच्या शैक्षणिक क्षमतेबद्दल सांगू शकतील.

## बारावीनंतरचे उत्तम करिअर पर्याय

बारावीचा निकाल जाहीर झाला आहे आणि पुढील उच्च शिक्षणासाठी तुम्ही कदाचित कॉलेजच्या शोधात असाल. हायस्कूलमधून बाहेर पडल्यानंतर करिअरसाठी योग्य निर्णय घेण्यासाठी तुम्ही तितके सक्षम नसता. म्हणून तुम्हाला योग्य कॉलेज आणि योग्य कोर्स निवडीसाठी योग्य मार्गदर्शनाची गरज असते. तुम्ही ज्या शाखेत इंटरमिडीएट पूर्ण केले आहे त्यावर हे अवलंबून आहे. जर तुम्ही सायन्स शाखेत असाल तर इंजिनीअरींग किंवा मेडीकलमध्ये करीअर निवडू शकता. जर तुम्ही कॉमर्स शाखेत असाल तर बी.कॉम. करू शकता, तसेच तुम्ही आर्टस् घेतले असाल तर बी.ए. करावे लागेल.

### सायन्स विद्यार्थ्यांसाठी

प्रथम आपण सायन्सच्या विद्यार्थ्यांना काय करीअर पर्याय आहेत ते पाहूया. येथे आपण कोणत्या विद्यार्थ्यांनी गणित विषय घेतला आहे आणि कोणी नाही हे पाहणे आवश्यक आहे. ज्यांनी गणित घेतले त्यांना आपण पीसीएस म्हणतो आणि ज्यांनी गणित घेतले नाही त्यांना आपण पीसीबी म्हणतो. एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल ती म्हणजे जर तुम्ही गणित घेतले नसेल तर तुम्ही इंजिनीअरींगला जावू शकत नाही. मग तुम्हाला फार्मसी सारखे इतर क्षेत्र निवडावे लागेल. त्यामुळे मॅट्रीकनंतर तुम्हाला तुमचे कॉम्बीनेशन काळजीपूर्वक निवडले पाहिजे.

पीसीएम आणि पीसीबी दोन्ही विद्यार्थ्यांना खाली काही सर्वोत्तम पर्याय दिले आहेत.

#### पीसीएम विद्यार्थ्यांसाठी

- **इंजिनीअरींग** – एरोस्पेस, अॅग्रीकल्चरल, ऑटोमोबाईल, बायोकेमिकल, बायोमेडीकल, बायोटेक्नॉलॉजी, बायोइन्स्ट्रुमेन्टेशन, बायोइन्फोर्मेटीक्स, ब्रॉडकास्ट टेक्नीशीयन, सीरॅमीक, केमिकल, सिव्हील, कॉम्प्युटर, कन्स्ट्रक्शन, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक, एनव्हायर्नमेंटल, फूड, फायर, इंडस्ट्रीयल, इन्स्ट्रुमेन्टेशन, लेदर, मरीन, मेकॅनिकल, माइनींग व मेटॅलर्जिकल, नॅनो टेक्नॉलॉजी, प्रिंटींग, प्रॉडक्शन, प्लॅस्टीक व पॉलीमर, रबर, जेनेटीक, टैलीकम्युनिकेशन, टेक्स्टाईल
- **आर्किटेक्चर**
- **कमर्शिअल पायलट**
- **मर्चन्ट नेव्ही**
- **इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी आणि कॉम्प्युटर्स** – अॅप्लीकेशन प्रोग्रामर, डाटाबेस अॅडमिनीस्ट्रेटर, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीस्ट, नेटवर्क अॅडमिनीस्ट्रेटर, सॉफ्टवेअर इंजीनीअर, सिस्टम आर्किटेक्ट, सिस्टीम/आयटी/टेक्नॉलॉजी मॅनेजर, वेब डेव्हलपर, मल्टीमिडीया डिझायनअर
- **हार्डवेअर** – हार्डवेअर डिझाईन व डेव्हलपमेंट इंजिनीअर, डिझाईन व डेव्हलपमेंट ऑफ कॉम्प्युटर हार्डवेअर, डिझाईन व डेव्हलपमेंट ऑफ कस्टमाईज्ड मायक्रोप्रोसेसर, डिझाईन व डेव्हलपमेंट ऑफ नेटवर्कींग हार्डवेअर, सर्व्हिस मेन्टेनन्स इंजिनीअर/टेक्निशीअन
- **डिफेन्स सर्व्हिसेस** – इंडियन आर्मी, एअर फोर्स आणि नेव्ही
- **फिजीकल सायन्स** – केमिस्ट, मॅथेमॅटीशीयन, अॅस्ट्रॉनॉमी, फॉरेन्सीक सायन्स, जिओग्राफर, जिओलॉजीस्ट, न्युक्लीअर फिजीसीस्ट, ओशीएनॉग्राफी, ऑपरेशन रिसर्च, अॅस्ट्रोफिजीसीस्ट, स्टॅटीस्टीशीअन

#### पीसीबी विद्यार्थ्यांसाठी

- **मेडीसीन** – डॉक्टर–ऑप्थॅल्मीक, गायनोकॉलॉजी, डरमॅलॉजी, ऑर्थोपीडीक्स, रेडिओलॉजी, इलेक्ट्रॉलॉजी, एन्डोक्रायनॉलॉजी, कार्डीओलॉजी, प्लॅस्टीक सर्जन, जनरल सर्जन्स, न्युरो सर्जन्स, पीडीएट्रीशीअन, थोरॅसीस सर्जन्स, ट्रॉमा सर्जन्स, युरोलॉजीस्ट, सेक्सोलॉजीस्ट, गॅस्ट्रोइन्टरोलॉजी, ऑनकॉलॉजी, अनास्थिशीऑलॉजी, इएनटी स्पेशालीस्ट, पॅथॉलॉजीस्ट
- **होमीपॅथी**
- **आयुर्वेदीक**
- **डेन्टीस्ट**
- **युनानी**
- **पॅरा मेडीकल** – फिजीओथेरॅपी, स्पीच थेरॅपी, ऑडीओलॉजी, नर्सींग, ऑक्युपेशनल थेरॅपी, प्रोस्थेटीक्स व ऑर्थोटीक्स, मेडीकल लॅब टेक्नॉलॉजी, ऑप्टोमेट्री व ऑप्थॅल्मीक टेक्नॉलॉजी, न्युट्रीशन व डायबेटीक्स
- **संबंधित क्षेत्रे** – इसीजी टेक्नीशीअन, हॉस्पीटल मॅनेजर/अॅडमिनीस्ट्रेटर, न्युक्लीअर मेडीसीन टेक्नॉलॉजीस्ट, रेडीएशन टेक्नॉलॉजी, पॅथॉलॉजी टेक्नॉलॉजी, रेस्पीरेटरी थेरॅपीस्ट, सोनोग्राफर टेक्नीशीअन, ऑपरेशन थिएटर असिस्टंट, नॅचरोपॅथी, योगा थेरॅपी, मसाज थेरॅपी, अॅक्युप्रेशन, अॅक्युपंक्चर
- **व्हेटनरी सायन्स**
- **बायोटेक्नॉलॉजी**
- **बायोसायन्सेस** – अॅग्रीकल्चरीस्ट, बॉटनीस्ट, झुओलॉजीस्ट, मायक्रोबायोलॉजीस्ट, बायोलॉजीस्ट, हॉर्टीकल्चरीस्ट, फ्लोरीकल्चरीस्ट, एनव्हायर्नमेन्टल सायन्स
- **फार्मसी** – क्लिनीकल रिसर्च
- **होम सायन्स**
- **बायोकेमिस्ट**
- **फिशरी सायन्स**
- **फॉरेस्ट्री व वाईल्डलाईफ**
- **मरीन बायोलॉजी**
- **फूड टेक्नॉलॉजीस्ट**

### कॉमर्स विद्यार्थ्यांसाठी

दहावीनंतर जर तुम्ही कॉमर्स घेतले असेल तरीदेखील तुम्हाला काही उत्तम करीअरचे पर्याय आहेत. तुम्हांला सर्वांना माहीत आहे की चार्टर्ड अकाउन्ट हे प्रत्येक कॉमर्स पदवीधराचे स्वप्न असते. मात्र आता ते इतर अनेक पर्याय निवडू शकतात. खाली काही कोर्सेस दिले आहेत जे तुम्ही करू शकता.

- **बॅकींग** – रिटेल/पर्सनल बॅकींग, कॉर्पोरेट बॅकींग, मर्चन्ट बॅकींग, ट्रेझरी ग्रुप, रूरल बॅकींग, प्रॉडक्ट मॅनेजमेंट, लोन्स एक्झीक्युटीव्ह

- **अकाउंटस् व फायनान्स** – चार्टर्ड अकाउंटन्ट, कॉस्ट व वर्क अकाउंटन्ट, सर्टीफाइड फायनान्शिअल ॲनालीस्ट, सर्टीफाइड फायनान्शिअल प्लानर
- **इन्शुरन्स** – ॲक्चुएरीअल सायन्स, इन्शुरन्स व रीस्क मॅनेजमेंट, इन्शुरन्स सर्व्हेअर, इन्शुरन्स एजेन्ट
- **इन्व्हेस्टमेन्टस्** – इक्विटी रिसर्च ॲनालीस्ट, इन्व्हेस्टमेन्ट बॅंकर, म्युच्युअल फंड एक्झीक्युटीव, स्टॉक ब्रोकर, कॅपीटल मार्केट मॅनेजर, फॉरेक्स डीलर, व्हेन्चर कॅपीटॅलीस्ट, रियल इस्टेट
- **मॅनेजमेन्ट** – हयुमन रिसोर्स, ब्रॅन्ड, इव्हेन्ट, इंटरनॅशनल बिझनेस, मार्केट रिसर्च, रिटेल, मार्केटींग व सेल्स, टेक्नॉलॉजी, डिसास्टर, एज्युकेशन, एनजीओ, रूरल, ऑपरेशन व लॉजीस्टीक्स, एक्स्पोर्ट, फॅमिली बिझनेस, मटेरीयल, फायनान्शिअल, बिझनेस डेव्हलपमेन्ट
- **कंपनी सेक्रेटरी**
- **इकॉनॉमिस्ट**

## आर्टस् विद्यार्थ्यांसाठी

तीसरी शाखा आहे आर्टस्. या शाखेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम करिअर निवडीसाठी अनेक पर्याय आहेत. दुर्दैवाने आपल्याकडे या शाखेला उत्तम करिअर म्हणून मानले जात नाही, परंतु हे खरे नाही आणि या शाखेत देखील भरपूर पर्याय उपलब्ध आहेत.

- **सायकॉलॉजी** – इंडस्ट्रीयल, सोशल, काउन्सीलींग, क्लीनीकल, स्पेशल एज्युकेशन, लर्नींग डिसएबीलीटी, हयुमन डेव्हलपमेन्ट, हयुमन रिसोर्सेस, मेन्टल रिटार्डेशन
- **सोशीओलॉजी** – जनरल सोशीओलॉजी, सोशल वर्क, सोशीओलॉजी ऑफ हेल्थ, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, एनव्हायर्नमेन्ट ॲण्ड रिलीजन, ऑक्युपेशनल ॲण्ड इंडस्ट्रीयल सोशीओलॉजी, कल्चरल स्टडीज, सोशल एक्स्लुझन ॲण्ड इन्क्लुझन पॉलीसी, सोशल ॲन्थ्रोपोलॉजी, सोशीओलॉजी ॲण्ड मास मिडीया, जेन्डर ॲण्ड सोसायटी, सोशीओलॉजी थिअरीज, सोशल डेमोग्राफी, क्रिमीनॉलॉजी
- **इकॉनॉमिक्स** – ॲग्रीकल्चरल, बिझनेस आणि क्वान्टीटेटीव्ह इकॉनॉमिक्स
- **फिलॉसॉफी**
- **लिटरेचर** – लिंग्वीस्ट
- **लॉ** – कंपनी सेक्रेटरी, लीगल रायटींग, डिफेन्स रायटींग, नोटरी, लॉ प्रोसेस आउटसोर्सींग, सॉलीसीटर, सिव्हील, क्रिमीनल, कॉर्पोरेट, प्रॉपर्टी, सेक्युरीटीज, इन्कम टॅक्स, इंटरनॅशनल, प्रोप्रायटी ॲण्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी
- **हिस्टरी** – हेरीटेज मॅनेजमेन्ट, क्युरेटर
- **जिओग्राफी** – अप्लाईड जिओग्राफी, जिओग्राफीक इन्फर्मेशन सायन्स ॲण्ड सिस्टीम्स, जिओग्राफीकल कार्टोग्राफी, रिमोट सेन्सींग ॲण्ड जिओग्राफीक इन्फर्मेशन सायन्स, जिओ इन्फोर्मेटीक्स
- **ॲन्थ्रोपोलॉजी** – फिजीकल किंवा बायोलॉजीकल, सोशल, प्रीहिस्टॉरीक, अप्लाईड, लिंग्वीस्टीक, फॉरेन्सीक
- **अर्कालॉजी** – मेडीकल, इस्टर्न, मरीन टाईम, अर्कालॉजी हेरीटेज मॅनेजमेन्ट, इजिप्टॉलॉजी, एपीग्राफी, न्युमीस्मॅटीक्स, लॅन्डस्केप अर्कालॉजी, एथनोग्राफी
- **पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन**
- **लायब्ररी सायन्सेस**
- **टिचींग**

म्हणून तुम्ही सायन्स, कॉमर्स किंवा आर्टस् यापैंकी कोणत्याही शाखेत असलात तरी करिअर निवडीसाठी तुमच्याकडे भरपूर कोर्सेस आहेत. त्याप्रमाणे योग्य निवड करा आणि तुमचे करिअर घडवा.

## जळगाव जिल्हा – १२वी निकाल (२०१५): ८७.५९ टक्के

**मागील वर्षीचा निकाल ८८.२९ टक्के**

(स्रोत: www.mahresult.nic.in)

### शाखा निहाय टक्केवारी मागील वर्षाच्या तुलनेत

| शाखा | २०१५ टक्के | २०१४ टक्के |
|---|---|---|
| सायन्स | ९६.०४ | ९४.०९ |
| आर्टस् | ८१.४१ | ८३.६५ |
| कॉमर्स | ८८.६५ | ९१.१८ |

### शाखा निहाय कामगिरी

| क्र. | शाखा | परीक्षार्थी विद्यार्थी | डिस्टीन्क्शन | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | पासींग श्रेणी | एकूण पास | पास % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सायन्स | १५७६१ | ८६३ | ७०३० | ७००५ | २३९ | १५१३७ | ९६.०४ |
| २. | आर्टस् | १९९०८ | ३६४ | ७४२९ | ७९४६ | ४६८ | १६२०७ | ८१.४१ |
| ३. | कॉमर्स | ४८७४ | ३८७ | १८५७ | १८९३ | १८४ | ४३२१ | ८८.६५ |
| ४. | एचएससी व्होकेशनल | २३३८ | १० | ७०३ | ११४९ | ३१ | १८९३ | ८०.९७ |
| | एकूण | ४२८८१ | १६२४ | १७०१९ | १७९९३ | ९२२ | ३७५५८ | ८७.५९ |

डिस्टीन्क्शन: ७४ टक्के वरील, प्रथम श्रेणी: ६०–७४ टक्के, द्वितीय श्रेणी: ४५–५९ टक्के, पासींग श्रेणी: ३५–४४ टक्के

एसडी–सीडकडून विद्यार्थीहितासाठी सततची चालू असलेली प्रक्रिया म्हणजे त्यांना वेळोवेळी जे उपयुक्त आहे त्या परिस्थितीनुसार देण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम. मागील चार महिन्यात एसडी–सीडने खाली दिलेल्या विविध विषयांवर एकूण ९ कार्यक्रम राबविले त्यात सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## 'परीक्षेला सामोरे जातांना' – २ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : डॉ. नरसिंग परदेशी

१. एच.जे. थीम कला व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

२. आर. आर. ज्युनिअर कॉलेज, जळगाव

**उपस्थिती** : सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – विद्यार्थ्यांचे परीक्षा काळातील मानसिक दडपण कमी व्हावे व त्यांना हसतखेळत परीक्षा देता यावी त्यासाठी शिक्षणक्षेत्रातील तज्ञ मंडळींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणे अत्यंत महत्वाचे असते.

## 'ध्येय निश्चिती व ते संपादन करणे' – १ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : प्रा. सुरेश पांडे

**ठिकाण** : भगिरथी आय.टी.सी., जळगाव

**उपस्थिती** : सुमारे १७५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करता यावे व यशस्वी जीवन घडविता यावे. विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चिती करून आत्मविश्वासाच्या बळावर येणारे अडथळे दूर करून आपले ध्येय गाठता यावे. जिदद्, आत्मविश्वास व चिकाटी या त्रिसूत्रीचा जीवनात सदैव वापर करून यशाच्या दिशेने पावले टाकता यावीत.

## 'व्यक्तिमत्व विकास' – १ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : प्रा. सुरेश पांडे

**ठिकाण** : आय. एम. आर. कॉलेज, जळगाव

**उपस्थिती** : सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, ज्ञानात भर पडावी व एक सुशिक्षित विद्यार्थी घडावा.

## 'मुलाखत कौशल्य' – १ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : श्री. ईश्वर जैन

**ठिकाण** : कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नोलॉजी, नॉर्थ महाराष्ट्र नॉलेज सिटी जळगाव

**उपस्थिती** : सुमारे १२५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – आजच्या स्पर्धात्मक युगात एकापेक्षा एक नोकरीच्या वाटा उपलब्ध झाल्या आहेत. त्या मिळविण्यासाठी मुलाखत कौशल्य असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यात अर्ज करणे, पूर्व लेखी परीक्षा, मुख्य लेखी परीक्षा, मुलाखत, इ. योग्य ते मार्गदर्शन त्यांना मिळायला हवे.

## 'इंग्रजी संभाषण कौशल्य' – १ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : प्रा. सुरेश पांडे

**ठिकाण** : एच. जे. थिम. कला व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

**उपस्थिती** : सुमारे १५० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – संभाषण हे माणसाच्या आयुष्यातील सर्वात मोठी शक्ती आहे. ज्या माणसांकडे भक्कम संभाषण कौशल्य नाही त्याची आयुष्याची इमारत कधीही उभी राहू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच 'प्रभावी संभाषण कौशल्य' असणे अत्यंत महत्वाचे आहे, जेणेकरून त्यांना आपल्या जीवनात यशस्वी होता येईल.

## 'मनाची एकाग्रता' – ३ कार्यक्रम

**मार्गदर्शक** : श्री. प्रविण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट

१. जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, जळगाव

२. मानवसेवा माध्यमिक विद्यालय, जळगाव

३. अभिनव माध्यमिक विद्यालय, जळगाव


**उपस्थिती** : सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**कार्यक्रमाचे उद्दिष्ट** – विद्यार्थी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर नियमितपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रभावी अभ्यासासाठी मनाची एकाग्रता असणे तितकेच महत्वाचे आहे. त्यासाठी कठोर परिश्रम करण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणजे यशाच्या शिखरापर्यंत निश्चितच त्यांना पोहचता येईल.









# आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा

उन्हाळा सुरु झाला आहे. काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता अधिकच वाढली आहे. उन्हाळ्यात अनेक आजार होत असल्याने प्रत्येकाने स्वत:चे आरोग्य स्वत: जपले पाहिजे. संभाव्य आजार टाळण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उन्हाळ्यात घरच्या घरी स्वत:ची प्रकृती कशी सांभाळाल याबाबत काही टिप्स.

- सकाळी दात घासल्यावर गायीच्या तुपाचे किंवा खोबरेल तेलाचे २–२ थेंब नाकात घालावेत. याला नस्य असे म्हणतात. यामुळे डोकं आणि डोळ्यातील उष्णता शमते.
- खमंग, कोरडं, शिळं, खारट, अती तिखट, मसालेदार आणि तळलेले पदार्थ, तसेच आमचूर, लोणचं, चिंच इत्यादी आंबट, कडू आणि तुरट पदार्थ खाणे टाळावे.
- कोल्ड ड्रिंक्स, आईस्क्रीम, टिकण्यासाठी रसायने वापरलेले फळांचे डबाबंद ज्यूस यांचे सेवन टाळावे. या पदार्थांमुळे पचनशक्ती बिघडते. शिवाय त्याच्या अतीसेवनामुळे त्वचारोग होतात.
- कैरीचे पन्हे, लिंबू, सरबत, जि–याचं सरबत, शहाळ्याचं पाणी, फळांचा ताजा रस, दूध घालून केलेली तांदूळाची खीर, गुलकंद इत्यादी थंड पदार्थांचा आहारात समावेश करावा. यामुळे सूर्याच्या प्रखर उष्णतेपासून शरीराचे रक्षण होण्यास मदत होते.
- उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तहान खूप लागत असल्याने पुरेसे पाणी प्यावे.
- या दिवसांत सैलसर सुती कपडे वापरावेत आणि केसांची स्वच्छता राखावी. प्लास्टिकची चप्पल वापरू नये.
- कडक उन्हात जायचे असेल, तर पाणी पिवून जावे. डोकं आणि डोळ्यांचे उन्हापासून रक्षण होण्यासाठी टोपी आणि गॉगलचा वापर करावा.
- उष्ण वातावरणातून थंड वातावरणात आल्यानंतर लगेच पाणी पिवू नये. १०–१५ मिनिटांनंतरच पाणी प्यावे.
- या दिवसांत फ्रिज किंवा कूलर यांमधील थंड पाणी प्यायलाने घसा, दात आणि आतडे यांवर दुष्परिणाम होतो, म्हणून साधे अथवा माठातील पाणी प्यावे.
- वाळ्याच्या मुळांच्या दोन जुड्या तयार कराव्यात. एक जुडी पिण्याच्या पाण्यामध्ये घालावी आणि दुसरी उन्हात वाळत ठेवावी. दुस–या दिवशी उन्हात वाळवलेली जुडी पिण्याच्या पाण्यात आणि पाण्यातील जुडी उन्हात ठेवावी. याप्रमाणे दररोज करावे. वाळ्याचे पाणी हे उष्णतेचे विकार दूर करणारे आहे. अधिक व्यायाम, अधिक परिश्रम, अधिक उपवास, उन्हात फिरणे आणि तहान–भूक रोखून धरणे इत्यादी गोष्टी टाळाव्यात.
- जळवात म्हणजे पायात भेगा पडणे आणि उष्णता यांचा त्रास होत असल्यास हातापायांना मेंदी लावावी.

# शैक्षणिक क्षेत्रात राहा अपडेट

## पदवी शिक्षणात 'पोर्टेबिलिटी'

पदवीचे शिक्षण चालू असतानाच विद्यापीठ बदलण्याची आतापर्यंत नसलेली सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. त्यासाठी देशातील सर्व राज्य विद्यापीठांत 'निवडीवर आधारलेली श्रेयांक पद्धत' (Choice Based Credit Transfer System) स्वीकारण्यास जवळपास सर्व राज्यांनी मान्यता दिली आहे.

## कॉलेजमध्ये 'व्हर्च्युअल क्लासरूम'

राज्यातील सर्व सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणा–या 'व्हर्च्युअल क्लासरूम' तयार कराव्यात, अशी सूचना वैद्यकीय शिक्षण व संशोधन मंत्री यांनी संबंधित अधिका–यांना केली आहे.

## मेडिकल, इंजिनीअरिंग प्रवेश राज्य सीईटीद्वारेच

२०१६ च्या शैक्षणिक वर्षासाठी राज्यात मेडिकल, मॅनेजमेंट आणि इंजिनीअरिंग प्रवेशांसाठी फक्त राज्य सरकारच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारेच (MH-CET) प्रवेश देण्याच्या निर्णयावर राज्य सरकारने शिक्कामोर्तब केले. या नव्या निर्णयानुसार राज्यातील शिक्षणसंस्थांना त्यांची स्वतंत्र सीईटी घेता येणार नसून, त्यांना राज्याच्याच सीईटीवर अवलंबून रहावे लागेल.

## शिक्षणासाठी आता इस्त्रायलचे सहकार्य

राज्यातील शिक्षणपद्धत अधिक विकसित करून भविष्यात शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी महाराष्ट्र सरकारला आता इस्त्रायलचे सहकार्य लाभणार आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग आणि इस्त्रायल दूतावासातील उच्च अधिका–यांसोबत झालेल्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली.

## परीक्षाकेंद्र घराजवळचे देणार

दहावी–बारावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षेदरम्यानची धांदल आता थांबण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना घराजवळच्या परीक्षा केंद्रांसोबतच, परीक्षा सुरू होण्यापूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिका हातात मिळणार आहेत. त्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री यांनी केलेल्या सूचनांचा राज्य माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ सकारात्मक विचार करत आहे.

## आमची उद्दिष्टे

ज्ञानयज्ञ

- सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
- सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
- सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



**रेवती अनिल जोशी, जळगाव (BE E&TC – 3rd Year)**

एसडी–सीड शिष्यवृत्ती म्हणजे माझ्यासारख्या गरजू विद्यार्थ्यांना एक कौतुकाची थाप आहे. आणि यामागे जे आशीर्वाद आहेत ते म्हणजे मा. सुरेशदादांचे. त्यांची विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता म्हणजे मध्यमवर्गीय कुटुंबांना मिळालेले वरदानच आहे. अडचणीच्या वेळी आपल्याला सावरणारे कोणीतरी आहे ही भावना फार आधार देवून जाते. आणि हा आधार आम्हां लाभार्थ्यांना मिळाला आहे. समाजात आमच्या प्रगतीची कोणीतरी दखल घेत आहे हेच आमच्यासाठी सुखावह आहे.

---



**सागर सुनील पाटील, चाळीसगाव (BE Mechanical – Final Year)**

माझ्यासारख्या असंख्य मुलांना मा. सुरेशदादांनी सुरू केलेल्या एसडी–सीड योजनेमुळे त्यांच्या पंखांना बळ मिळाले. यावरून दादांना आमच्याप्रती असलेली आपुलकी जाणवते. या योजनमुळे एका अर्थाने विद्यार्थ्यांच्या भविष्यास परीसस्पर्श झाला. मला प्राप्त शिष्यवृत्तीमुळे माझ्या शिक्षणात कधीच आर्थिक समस्या आड आली नाही. दादांच्या मदतीमुळे मी त्यांचा सदैव ऋणी राहील आणि त्यांच्यासारखेच सत्कर्म माझ्या हातून भविष्यात घडो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

---



**मनोज देवीदास सोनार, पाचोरा (Diploma in Mechanical – Final Year)**

मा. सुरेशदादांनी सुरू केलेले हे पवित्र कार्य खरोखरच अतिशय वाखाणण्याजोगे आहे. मी आपणांस सांगू इच्छितो की, माझे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माझ्या पगारातून जे काही मला देता येईल ते मी या संस्थेला देईन आणि एसडी–सीड सदस्य म्हणून कार्यरत होईल. आपल्या सर्व सदस्यांचे धन्यवाद.

---



**हर्षल रविंद्र पवार, धरणगांव (BE E&TC – Final Year)**

आजच्या युगात सत्य पण कटू गोष्ट म्हणजे भाउ भावाला मदत करीत नाही. जर आपली अशी समजूत असेल की कोणी कोणाला मदत करीत नाही, तर त्याला अपवाद आहे ते म्हणजे आपले दादा. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, एसडी–सीड ही जळगावातील मनापासून कार्य करणारी एक संस्था आहे.

मी दादांचा खूप मनापासून आभारी आहे की त्यांनी त्यांचा हात आमच्यासारख्या होतकरू विद्यार्थ्यांच्या शिरावर ठेवला. त्यासाठी मी त्यांचा सदैव आभारी असेन.




**HEAD OFFICE:**

7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.

Tel: (0257) 2235254 | Fax: (0257) 2234258 | Website: www.sdseed.in